पुण्य नगरी

# कालवडे कृषी विज्ञान केंद्रातर्फे कृषी संकल्प अभियानास प्रारंभ

**वाठार / प्रतिनिधी**

कालवडे (ता. कराड) येथील कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने विकसित कृषी संकल्प अभियानास प्रारंभ करण्यात आला. विकसित कृषी संकल्प अभियान दि. २९ मे ते १२ जून दरम्यान राबविण्यात येणार असून जिल्ह्यातील १५० गावांत माहिती रथ जाणार आहे. कालवडे, रेठेरे बु, रेठेरे खुर्द, चचेगाव, विंग, कोळे, मसूर, निगडी, वण्याचीवाडी, घोलपवाडी, किवळ, शेरे या गावात माहिती रथ पोहचला.

कालवडे येथील कृषि विषज्ञान केंद्र तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर आणि सातारा कृषी तंत्रज्ञान व्यस्थापन यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषि संकल्प अभियान २९ मे ते १२ जून या पंधरवड्याचा प्रारंभ रेठेरे खुर्द येथे गुरुवार दि.२९ मे रोजी सरपंचांच्या हस्ते झाला. शेतकऱ्यांशी थेट संवाद, शासकीय योजनांची माहिती, नवीन प्रयोगांचे माहिती संकलनचा कार्यक्रम राबवला जाणार आहे.

Satara Edition
Jun 01, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

तरुण भारत संवाद

# विकसित कृषी संकल्प अभियानाचा रेठरे खुर्दमधून प्रारंभ

## कालवडे येथील कृषी विज्ञान केंद्राचा उपक्रम, १५० गावांतील शेतकऱ्यांशी थेट संवाद

वार्ताहर
वाठार

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, कल्याणी गोरक्षण ट्रस्ट, कृषी विज्ञान केंद्र, कालवडे (ता. कराड) तसेच महाराष्ट्र शासन कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, कृषी तंत्रज्ञान व्यस्थापन यंत्रणा, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषी संकल्प अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. २९ मे ते १२ जूनदरम्यान होणाऱ्या या अभियानाचा प्रारंभ रेठरे खुर्द (ता. कराड) गावामध्ये गुरुवार २९ मे रोजी सरपंच सुनीता साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आला.



रेठरे खुर्द : अभियानाच्या प्रारंभप्रसंगी उपस्थित शास्त्रज्ञ, अधिकारी, शेतकरी.

यामध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषदचे शास्त्रज्ञ डॉ. संतोष राठोड, डॉ. गोपाळकृष्ण, प्रा. डॉ. विकास कारंडे, डॉ. चंद्रकांत कांबळे, डॉ. भरत खाडेकर, निलेश थोरात, विशाल महाजन, डॉ. दिलीप घोंगडे तसेच मंडळ कृषी अधिकारी अभिजित पाटील, पवन जोशी, शुभप्रद्या मोहिते, आत्मा विभाग, कराडचे तंत्रज्ञान व्यवस्थापक पूनम जाधव हे उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी शासकीय योजनांची व कृषी तंत्रज्ञान याची माहिती येथील सर्व शेतकऱ्यांना दिली. अशा कार्यक्रमामध्ये उत्स्फूर्त भाग घेऊन सहभाग नोंदवावा, असे आवाहन कल्याणी गोरक्षण ट्रस्ट, कालवडेचे विश्वस्त गौरीशंकर कल्याणी व रोहिणी कल्याणी यांनी केले आहे.

### विविध कार्यक्रम

या अभियानांतर्गत शेतकऱ्यांसोबत थेट संवाद कार्यक्रम, कृषीचे नवीन तंत्रज्ञान, शासकीय योजनांची माहिती, शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया व नवीन प्रयोगांचे माहिती संकलनाचा कार्यक्रम प्रत्येक गावामध्ये राबवला जाणार आहे. कृषी विज्ञान केंद्र, कालवडेमार्फत कराड, पाटण, कोरेगाव, खटाव व माण तालुक्यातील सुमारे १५० गावांमध्ये माहिती रथ जाणार आहे.